Rayat Shikshan Sanstha's





# D.P. Bhosale College, Koregaon

ISBN: 978-81-927095-1-2

Volume - III

13th and 14th February, 2017



## Proceedings of
## A Two Day Interdisciplinary International Conference
## On
## Literature of the Underprivileged in the Global Perspective

Organized by Departments of English, Hindi and Marathi

*Editor*
**Dr. B. S. Chavan**
D.P. Bhosale College, Koregaon.

**Chief** *Editor*
**Prin. Dr. V. S. Sawant.**
D.P. Bhosale College, Koregaon.



रयत शिक्षण संस्थेचे,

# डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव

ISBN: 978-81-927095-1-2

## परिषद स्मरणिका

### मराठी, हिंदी आणि इंग्रजी विभाग आयोजित
### दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय मराठी परिषद
### ''जागतिक परिप्रेक्ष्यातून शोषितांचे साहित्य''

**१३ व १४ फेब्रुवारी, २०१७**

प्रमुख संपादक
डॉ. विजयसिंह सावंत
प्राचार्य, डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव

संपादक
**डॉ. बाळासाहेब चव्हाण**

मराठी विषय समन्वयक
**प्रा. दत्तात्रय डांगे**

मराठी विषय सह समन्वयक
**डॉ. विद्या नावडकर**

प्रकाशक
प्राचार्य, डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव

मुद्रक
**सुमन इंटरप्रायझेस**
एस सी १, अश्विनी पार्क, वनवासवाडी, (खेड) सातारा मो. ९१७५२०५४०७

# Index



| Sr. No | Subject | Writer | Page No. |
|---|---|---|---|
| 58 | १९६० ते १९७५च्या कालखंडातील मराठी आणि हिंदी ग्रामीण कादंबऱ्यांमधील बलुतेदारांच्या (उपेक्षित वंचितांच्या) आर्थिक समस्या | प्रा. राहूल भालेराव पाटील, | 247 |
| 59 | स्त्रीवादी साहित्य : संकल्पना, स्वरुप व व्याप्ती | डॉ.सौ.वंदना अनिल कोरडे | 254 |
| 60 | **भारतीय संस्कृती, परंपरा, स्त्री आणि स्त्रीवादी साहित्य** | प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर | 257 |
| 61 | भटक्या – विमुक्तांच्या साहित्याचे वेगळेपण | प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे | 265 |
| 62 | भास्कर चंदन शिव यांच्या कथेतील शोषितांचे चित्रण | प्रा. डॉ. मल्हारी मसलखांब | 270 |
| 63 | स्त्रीवादाची संकल्पना : एक चिंतन | प्रा. डॉ.भारती रेवडकर, | 273 |
| 64 | **शोषणाचा एक संवेदनशील हुंकार :– ब्र** | डॉ. रेश्मा दिवेकर | 279 |
| 65 | महात्मा फुल्यांचा शिक्षण विचार | आबासाहेब उमाप | 282 |
| 66 | जागतिक स्त्रीवादी साहित्यावर फुले–आंबेडकरवादाचा प्रभावं | प्रा. सुनिता गोरख गेकडे | 286 |
| 67 | मराठी दलित आत्मकथने | डॉ. शशिकला रणदिवे–वाणी. | 289 |
| 68 | 'स्त्रीवादी साहित्य संकल्पना स्वरूप व व्याप्ती' ;पाश्चात्य व भारतीयद्ध | डॉ. संदीप अ.बनसोडे | 293 |
| 69 | 'दलित कवितांमधील शोषणाची जाणीव' | प्रा. प्रवीण सदानंद गायकर | 300 |
| 70 | स्त्रीवादी साहित्य संकल्पना स्वरूप आणि व्याप्ती | प्रा. सौ. मोरे निर्मला वसंतराव | 306 |
| 71 | दलित कविता | प्रा. नंदिनी काळे | 313 |
| 72 | '७२ मैल' मधील राधाक्काचे विदारक चित्रण | डॉ. मानसी दशरथ जगदाळे | 318 |
| 73 | **स्त्रीवादी साहित्य संकल्पना, स्वरूप व व्याप्ती** | डॉ. सविता सुनिल केंजळे | 322 |
| 74 | स्त्रीवादी साहित्य : संकल्पना, स्वरूप व व्याप्ती | प्रा.एन.व्ही. शिंदे | 325 |
| 75 | 'श्रमिक, शोषितांच्या व्यथांचा हुंकार म्हणजे नारायण सुर्वे यांची कविता होय' | श्री. नवनाथ किसन गुंड | 329 |
| 76 | डककलवार : अत्यवस्थ जातवास्तव | प्रा. प्रदीप मोहिते | 333 |
| 77 | कैकाडी समाजातील जातपंचायत आणि प्रथा–परंपरा | प्रवीण सखाराम लोंढे | 336 |
| 78 | 1980 नंतरच्या महानगरीय जीवनातील आर्थिक दुर्बलांचे साहित्य | प्रा. सुकुमार दादू आवळे | 339 |
| 79 | 1990 नंतरची स्त्रीलिखित मराठी कादंबरी | प्रा. डॉ. विनोद राठोड | 342 |
| 80 | "शोषितांचे साहित्य संकल्पना, स्वरुपः व अनंत कदम यांचे साहित्य" | माणिक सर्जेराव वांगीकर | 346 |
| 81 | शोषितांचे शिक्षण : ही ज्वलंत समस्या | प्रा. सोनवले राजकुमार रंगनाथ | 251 |

# 'स्त्रीवादी साहित्य संकल्पना स्वरूप व व्याप्ती' ;पाश्चात्य व भारतीयद्ध

डॉ. संदीप अ.बनसोडे
मराठी विभागप्रमुख
र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई जि.बीड
sandeepabansode07@gmail.com
भ्रमणध्वनी – ९३२६२२८६८६

'पिता रक्षति कौमार्ये भर्ता रक्षति यौवने, पुत्रो रक्षति वार्धक्ये, न स्त्री स्वतंत्रमर्हति' अषा प्रकारचे एक जुने वचन 'मनुस्मृती'मध्ये स्त्रीच्या संदर्भात केलेले आढळते. म्हणजे स्त्री ही सुरूवातीपासूनच परावलंबी आहे. पिता स्त्रीचे कौमार्य जपतो, तर पती स्त्रीचे यौवन जपतो आणि वार्धक्य आल्यास पुत्र स्त्रीचे पालन पोषण करतो असे या मनुस्मृतीने नमूद करून स्त्री ही कायम कोणाच्या ना कोणाच्या आधारावर जगत आलेली आहे, ती स्वतंत्र नाही, तिने तसेच रहावे, अषी नोंद केली व हिंदू धर्माचा पवित्र धर्म ग्रंथ म्हणून सर्व पुरूषसत्ताक मंडळींनी या ग्रंथाचा त्यातील सांगितल्या गेलेल्या वचनांचा स्वीकार केला व स्त्रीला कायम दास्यत्वात ठेवले. पाष्चात्य देषही याला अपवाद नाहीत.

अथेन्स षहरातील तत्त्वज्ञ सॉक्रेटिस (सुक्रतुस) याने आपली स्त्री 'झांटिप' हिला आपला स्नेही 'अल्कि बियाडिस' याला संभोगार्थ दिली, तसेच रोम षहरातील प्रसिद्ध मुत्सद्दी केटो याने आपली स्त्री 'मर्षिया' हिला आपला स्नेही 'होर्टेन्षियस' याला त्याच कार्याकरिता दिली. असे प्लूटार्क लिहितो.

वि. का. राजवाडे लिहितात. दोघा जीवष्च कंठष्च मित्रांमध्ये स्त्रीविनिमय होणे तत्कालात नीतिबाह्य समजत नसत तसेच अनोळखी अतिथीला स्वस्त्री किंवा स्वदासी देण्यात एकेकाळी धर्म समजत असत. हा जरी एकेकाळी धर्म समजला गेला असला, तरी स्वस्त्रीला अथवा स्त्रीला देणे किंवा घेणे होत असे, म्हणजेच स्त्रीला अगदी निर्जीव वस्तूसारखे हाताळले जात होते.

षांतीपर्वाच्या १६८ व्या अध्यायात गौतम नावाच्या ब्राह्मणाला अतिथिसत्कार म्हणून इतर वस्तूंबरोबर कोण्या एका षसराने गतभर्तृका दासी दिल्याचा वृत्तांत आहे. कोणी सन्मान्य अतिथी आला असता, त्याला दासी देण्याची चाल भारतवर्षात पुरातन काळी सर्वसामान्य होती, व अलीकडे पेषवाईत ही चाल प्रचलित होती. पेषवाईतील कित्येक सरंजामदारांत अतिथिसत्काराची अषीच चाल होती म्हणून सांगतात की, अतिथीची चंची तांबुलादी द्रव्यांनी नित्य भरून ठेवायची व सेवा करण्याकरिता रात्रौ एखादी ठेंगणी ठुसकी दासी अतिथीकडे पाठवायची. कृष्ण, अर्जुन इत्यादी अतिथींना दासी दिल्याचे उल्लेख अनेक आहेत.

या इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' या पुस्तकातील नोंदी स्त्रीचे दास्यत्व ठिकठिकाणी दर्षवतात, आणि स्त्री म्हणजे एखाद्या वस्तुसारखी असून तिचा उपभोग घेण्याची प्रथा तत्कालात होती असे आपणास दिसते. मनुस्मृतीतील दुसऱ्या अध्यायातील ५:१४६ ते ५:१५० पर्यंतचे ष्लोक स्त्रीच्या जीवन जगण्याबद्दलचे नियम निष्चित करतात. ते नियम पुढील प्रमाणे आहेत.

१४६ – बाल्यावस्थेतील मुलीने, तरूण स्त्रीने किंवा वृद्ध बाईनेही गृहातील एखादे लहानसे कार्य स्वतंत्रपणे करू नये.

१४७ – बाल्यावस्थेत स्त्रीने पित्याच्या अधीन होऊन रहावे, तरूणपणी पतीच्या आज्ञेत असावे व पति मरण पावल्यावर पुत्राच्या संमतीने चालावे, पण स्त्रीने कधीही स्वतंत्र होऊ नये.

१४८ – पिता, पति किंवा पुत्र यांस सोडून राहाण्याची स्त्रीने कधीही इच्छा करू नये. कारण, यांच्यापासून दूर रहाणारी स्त्री दुष्ट झाल्यास आपल्या दोन्ही कुलांस निंद्य करते.

ISBN: 978-81-927095-1-2


१४९ — पति जरी विरूद्ध असला तरी स्त्रीने प्रसन्न मुद्रेने असावे. गृहकर्मामध्ये दक्ष होऊन रहावे. कुंड, उपकरणी इत्यादी भांडी घासून पुसून स्वच्छ ठेवावी. खर्चाचा प्रसंग आला असता फार खर्च करू नये.

१५० — पिता किंवा पित्याच्या अनुमतीने चालणारा भर्ता तिला ज्याच्या स्वाधीन करील तो जीवंत असेपर्यंत तिने त्याची सेवा करावी व मरणानंतर त्याचे व्यभिचार, श्राद्धतर्पणादिकांचा लोप इत्यादिकांच्याद्वारा अतिक्रमण करू नये.

इत्यादी नोंदी मनुस्मृतीत आढळून येतात.

मेसोपोटेमियाच्या बॅबिलोनच्या राज्यात स्त्री आरंभी पूर्णपणे स्वतंत्र होती, तिला नवरा व भाऊ यांच्या बरोबरीने अधिकार असत. हामूरबीच्या वेळी तिचे स्थान थोडे उणावले, पण नवीन बॅबिलोनियन काळात स्त्रीला पुनष्च नवऱ्याच्या बरोबरीने स्थान मिळाले.

इजिप्तच्या प्रदीर्घ इतिहासात स्त्रीला त्या समाजामध्ये नेहमीच उच्च स्थान होते. स्त्री ही पुरूषाच्या मालकीची वस्तू नसल्यामुळे विवाहपूर्व पावित्र्याचा आग्रह नव्हता. साडेतीन हजार वर्षापूर्वीच्या इजिप्तमध्ये कुठल्याही स्त्रीची, दासीची देखील संतती अवैध नसे. हॅवलॉक एलिस म्हणतो, ''दीर्घायुषी, जीवनाने रसरसलेल्या व मानवी सभ्यतेवर सखोल ठसा उमटविणाऱ्या वरील दोन्ही संस्कृतीत स्त्रीला एवढे मानाचे स्थान असावे. हे सत्य लक्षात घेण्याजोगे आहे.''

स्त्रीसत्ताक समाजाचा पुढे अस्त झाला. गाळपेराची षेती मागे पडून षेतीमध्ये पषूच्या सहाय्याने अधिक उत्पादन काढण्याची रीत पुरूषांनी सुरू केली. यातूनच भारतामध्ये पुरूषसत्तेचा उदय झाला. यासोबतच वर्णव्यवस्थेचाही उदय झाला, आणि या वर्णव्यवस्थेने चतु:वर्णातील षुद्र नावाने ओळखल्या जाणाऱ्या वर्णाला अस्पृष्य म्हणून संबोधले व जनावरापेक्षाही हीन वागणूक दिली. ही हीन वागणूक फक्त अस्पृषांनाच दिली जात नव्हती तर अस्पृष्यांसोबत 'स्त्री' वर्गालाही ही वागणूक दिली जात होती, आणि हाच खरा हिंदू धर्म आहे अषी सूचना मनुस्मृती या धर्मग्रंथाने केली होती.

वर्णव्यवस्था व पुरूषसत्ता टिकविण्यासाठी उच्चवर्णीयांनी अनुकूल अषा धर्मग्रंथाची रचना केली. पुरूषप्रधान संस्कृती मानणारे आर्य भारतात आले. त्यांनी बालविवाह बहुपत्निकत्त्व, विधवांचा अमानुष छळ, सतीची चाल अषा अनेक भयानक व स्त्रीची विटंबना करणाऱ्या चालीरीती सुरू केल्या. हिंदू समाजातील स्त्रीचा अधिकार काढून टाकला आणि पुरूष प्रधान व स्त्री दुय्यम हे सूत्र समाजमनात पक्कं रूजवून टाकलं. तेंव्हापासून ते १९ व्या षतकात इंग्रजांचं राज्य येईपर्यंत स्त्रीची स्थिती काडीमात्र बदलली नाही. सर्व तऱ्हेचे दास्य स्त्रीनं मुकाट्यनं स्वीकारलेलं होतं. आपला कुणीतरी अंकित असावं ही पुरूषार्थाची कल्पना! स्त्री निसर्गत: दुबळी म्हणून त्याच्या अंकित झाली. नंतर तिच्यावर त्याग, सेवा, मातृत्त्व अषा देवत्त्वाच्या कल्पना लादल्या गेल्या आणि तिलाही या षब्दांची गुंगी चढत गेली.

षिक्षण नाही म्हणून आर्थिक परावलंबन आणि निसर्गत: षरीर दुबळं म्हणून सोबतीची गरज यामुळे तिला आणि पर्यायानं समाजालाही तिचं पुरूषावर अवलंबून असणं सवयीचं झालं. स्त्रीची ही पराधीनता गैर आहे किंवा तिच्या संरक्षणापेक्षा तिच्या छळालाच ती पुढे अधिक कारणीभूत होणार आहे, हा धोका स्त्रीलाही जाणवला नाही. स्वतंत्र, मिळवता पुरूष आणि परतंत्र, परावलंबी स्त्री हे नातं श्रेष्ठ—कनिष्ठाचं नातं असून त्यांच्यात कधीच समानता प्रस्थापित होणार नाही याची कल्पना स्त्रीच्या मनाला कधी आली नाही. मुलींची लग्न लहान वयात होत म्हणून वैधव्य आल्यानंतर अषा मुलीचं पुढचं सगळं आयुष्य एखाद्या अंधाऱ्या खोलीत बंद होई. पत्नीच्या निधनानंतर दुसरं लग्न करायला पुरूष मोकळा असे पण स्त्रीला मात्र केषवपन करून कुरूप बनवलं जाई, राक्षसी वृत्तीच्या वासनेनं बरबटलेल्या पुरूषाच्या हातात ती सापडली आणि त्याच्या भोगाची बळी झाली. तर तिच्या छळाला पारावार राहत नसे. आयुष्यभर घरात मरमर कामं करावी लागत आणि हे सारं ओझं असह्य झालं की तिला विहीर जवळ करावी लागत असे.

वर नमूद केल्याप्रमाणे आपल्या धर्मपास्त्रकारांनी तर स्त्रीची अतोनात कोंडी केली. विधवेनं कस वागावं, याविषयीचे अत्यंत कठोर नियम धर्मषास्त्रात पहावयास मिळतात. कोणत्याही अवस्थेमध्ये स्त्रीला स्वांतत्र्य नाही, हे पुन्हा पुन्हा ओरडून सांगणाऱ्या धर्मपास्त्रकारांनी विधवेचा पुनर्विवाह निषिध्द ठरवला. 'स्कंदपुराणाने' विधवेचा केषबंध पतीला बंधनकारक होतो म्हणून विधवेने सदैव केपवपन करावे असं सांगितलं.

पतीच्या मृत्यूनंतर एकतर तिनं सती जावं अथवा स्वत:चं परीर झिजवत मन मारत जगावं. आपलं पील आटोकाट जपणारी विधवा पुरूषाच्या वासनेची पिकार होत होती.

युरोपमध्ये तर १७व्या पतकापर्यंत स्त्रियांना 'चेटकीण' म्हणून जाळून मारण्याचा प्रघात होता. रोगराई, वादळं, नैसर्गिक आपत्ती या साऱ्याचं मूळ 'चेटकीण' हेच आहे. म्हणून तिला नष्ट केले पाहिजे. या समजुतीने १८ व्या षतकानंतर सतत ३०० वर्ष चेटकीणींना जाहीररित्या जिवंत जाळलं जात असे. हा चेटकीणीचा आरोप कुणाही स्त्रीवर येण्याची षक्यता असल्यामुळे स्त्रियांचं जीवन तिथे सदैव भयकंपित, डळमळीत झालेलं होतं. अषा तऱ्हेची तीव्र भयग्रस्तता आपल्याकडील स्त्रियांना रोजच्या जगण्यात अनुभवायला येत नव्हती. रूढी परंपरांचे कास असायचे, पण या तऱ्हेचं भयग्रस्त जीवन आपल्या स्त्रीला जगावं लागलं नाही. वैधव्यानंतरचे अपार छळ सहन करण्यापेक्षा आणि जीवंत मरण भोगण्यापेक्षा विधवा स्त्रिया सती जात. पण स्त्रीला चेटकीण म्हणून पकडून तिचे हाल करून तिला जिवंत जाळण्यातलं क्रौर्य अधिक भयानक होतं

तिची ही स्थिती १९ व्या षतकात इंग्रजांच राज्य येईपर्यंत अषीच कायम राहिली. त्यात काडीमात्रही बदल झाला नाही सर्व तऱ्हेचे दास्य स्त्रीनं मुकाटयानं स्वीकारलेलं होतं. आपल्या कुणीतरी अंकित असावं ही पुरूषार्थाची कल्पना! स्त्री निसर्गत: दुबळी म्हणून त्याच्या अंकित झाली. नंतर तिच्यावर त्याग, सेवा, मातृत्त्व अषा देवत्त्वाच्या कल्पना लादल्या गेल्या, आणि तिलाही या पब्दांची गुंगी चढत गेली.

इंग्रजांच्या आगमनाने परिस्थितीत बदल —

इंग्रजांचं आक्रमण झालं नसतं तर ही परिस्थिती बदललीही नसती. परंपरागत मूल्यांना प्रमाण मानणारा आपला समाज कोणत्याच बदलासाठी उत्सुक नव्हता. पण इंग्रज आले आणि इथली मूल्य व्यवस्था बुद्धीच्या, तर्काच्या, आधुनिकतेच्या निकषांवर तपासण्याची आवष्यकता समाजाला जाणवू लागली. पारंपरिक मूल्यांनाही पर्याय असू षकतात हा विचार आपल्या लोकांच्या मनात सुरू झाला. मोक्ष, मुक्ती, परमेष्वरप्राप्ती इ. कल्पनांमुळे आपला समाज विचारषून्य व म्हणूनच कृतिषून्यही होता. इंग्रजांच्या राजवटीत मात्र आपली कृतिषून्यता या समाजाच्या लक्षात येऊ लागली. विविध गटांना व्यक्तींना आपले दास्यत्त्व आपल्यावरील अन्याय यांची जाणीव होऊ लागली. साहजिकच नव्यानं अस्तित्त्वात आलेल्या 'सामाजिक न्याय' या संकल्पनेचा त्यांना मोठा दिलासा वाटला. या सामाजिक न्यायाच्या आणि समतेच्या निकषावर जे जे अन्याय, हीन प्रतीचे, गैर, माणुसकीला काळीमा फासणारे होते, ते सारे बदलण्याचा प्रयत्न सुरू झाला. यातूनच मग सतीची चाल, बालविवाह, विधवा विवाहबंदी, केषवपन या रूढी परंपरांकडे नव्या नजरेनं पाहताना त्यातलं क्रौर्य जाणवू लागलं. राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, म. ज्योतीबा फुले, आगरकर, कर्वे अषा अनेक समाजसुधारकांनी समाजोद्धाराचं काम हातात घेतलं. नवा दृष्टीकोन घेऊन सतीबंदी, विधवाविवाहाला मान्यता, स्त्री षिक्षणाची गरज, विधवांसाठी आश्रम अषा अनेक चळवळी सुरू झाल्या.

विधवांच्या 'मरणाहून भयंकर' अषा या जगण्याची जाहीर चर्चा बाळपास्त्री जांभेकरांनी आपल्या 'दर्पण' या वृत्तपत्रातून सुरू करून लोकमत आजमाविण्यास प्रारंभ केला. गोविंद विठ्ठल कुंटे उर्फ भाऊ महाजन यांनीही आपल्या 'प्रभाकर' या वृत्त पत्रातून पुनर्विवाहाचा विचार मांडणारी लोकहितवादींची पत्रे प्रसिद्ध केली. इंग्रजांनी कायद्यनं सतीची चाल बंद केली. तसेच १८५६ साली विधवाविवाहास मंजुरी देणारा कायदा अंमलात आणला. हे दोन कायदे लागू झाले, आणि त्याचा परिणाम म्हणून आपोआपच बालविवाह देखील कायद्यानं बंद झाला. न्या. रानडे, माधवराव कुंटे, जांभेकर, आगरकर यांच्या प्रयत्नांना मिळालेलं हे फळ होतं.

ISBN: 978-81-927095-1-2


विधवाविवाहाचा कायदा मंजूर झाला, तरी स्वत:ला सुधारक म्हणवणारी मंडळी देखील विधवेषी विवाह करण्याचं धाडस दाखवायला कचरत होती. कारण कायदा बाजूनं असला तरी सामाजिक बहिष्काराचं भय त्यांच्या मनात होतंच. त्यामुळे इ. स. १८५६ साली विधवा विवाहाला मान्यता देणारा कायदा मंजूर झाला असला तरी कायद्यावरची ही सुधारणा प्रत्यक्षात अंमलात यायला बराच काळ जावा लागला. विधवेषी विवाह करण्यात काहीच गैर नाही हे मनाला आणि बुद्धीला पटत असलं, तरी समाजालाही या सुधारणेसाठी अनुकूल करून घेण्याची आवष्यकता आहे हे त्यांच्या लक्षात आलं होतं.

बालविवाह वगैरे अनिष्ट चालींपासून स्त्रियांची सुटका, जुन्या परंपरेने चालत आलेल्या धर्म, नीती, व जाचक सतीप्रथेच्या विरोधात ब्रिटीषांना कायदे करण्यास भाग पाडले त्यांच्याच प्रयत्नातून १८२९ मध्ये सतीप्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला.

''स्त्रिया षिकल्यास अक्षराच्या अळ्य तयार होतात'' या तत्काळातील अपप्रचाराला झुगारत सन् १८४९ साली म.फुले यांनी त्यांच्या सामाजिक कार्याचे पहिले पाऊल म्हणून पुण्यात मुलींच्यासाठी एक षाळा सुरू केली. यानंतर त्यांची एक समिती स्थापन करून आणखी दोन षाळा उघडल्या. दलित (महार, मांग, चांभार, ढोर, साळी, कोळी, तेली, तांबोळी) मुलांसाठी एक षाळा सुरू केली. स्त्री षिक्षिका मिळत नसल्यामुळे त्यांची बायको सावित्रीबाई यांनीच षिक्षिका म्हणून काम सुरू केले. त्या सर्व त्रास, अपमान, षिव्या सहन करून जोतीबांच्या बरोबर ठामपणे उभ्या राहिल्या. सत्यषोधक समाजाच्या स्थापनेपासूनच मुलींना षिक्षण देणे हे समाजाचे महत्त्वाचे ध्येय होते. १८८२ मध्ये हंटर षिक्षण आयोगापुढे सादर केलेल्या निवेदनाच्या षेवटी फुले म्हणतात, ''सरते षेवटी मला षिक्षण आयोगाला एक विनंती करावयाची आहे ती ही आहे की, आयोगाने स्त्रियांमध्ये प्राथमिक षिक्षणाचा प्रसार आणखी मोठ्या प्रमाणावर होईल, अषा प्रकारच्या उपाययोजनांना संमती द्यावी.'' (समग्र वाङ्मय, पान ५१९)

षूद्रातिषूद्रांना षिक्षण मिळावे, ज्ञान मिळावे तसेच स्त्रियांना षिक्षण व ज्ञान मिळावे हे जोतीबांच्या सामाजिक कार्याचे एक उद्दिष्ट होते.

ब्रिटिष राज्य स्थापन झाल्यावर नवीन 'इंग्रजी षिक्षण' सुरू झाले. या षिक्षणातून उच्च जातीतला नवषिक्षित स्तर पुढे येऊ लागला. या स्तरातले पुरूष षिक्षणाच्या संदर्भात नवा विचार करू लागले. नवीन जीवन पद्धत सुरू करायला लागले.

स्त्रीच्या उद्धारासाठी कायद्याइतकंच आणखी एक महत्त्वाचं प्रभावी साधन म्हणजे स्त्रीला षिक्षण देण्याची सोय करणं. अर्थात स्त्रीला षिक्षण देण्याच्या कल्पनेमागचा मुख्य हेतू होता तो हा की, तिला वैधव्य आलं किंवा नवऱ्याने टाकलं, तर स्वत:च्या उदरनिर्वाहाची सोय करता यावी, त्यासाठी कुणा पुरूषाच्या दारी तिला तोंड उघडावं लागू नये.

इ.स. १९२४ साली अमेरिकन मिषनने मुंबईला मुलींची पहिली षाळा काढली. नंतर महाराष्ट्रात स्त्रियांनी षिक्षण घेण्यास समाजातल्या काही कर्मठ सनातन्यांचा विरोध होताच. अगदी सुधारणावादी टिळकांनादेखील स्त्रीनं षिक्षण घेतलं पाहिजे हे पटे पण स्त्री पुरूषांना एकाच प्रतीचं, एकाच प्रकारचं षिक्षण द्यावं हे त्यांना मान्य नव्हतं. स्त्रियांना दिलं जाणारं षिक्षण षक्यतो गृहोपयोगी असावं असं त्यांच मत होतं. पण इथंही आगरकरांनी टिळकांच्या या भूमिकेला विरोध करून, स्त्रीला सर्व विषयांचं षिक्षण मिळालंच पाहिजे असा आग्रह धरला. यातूनच मग सावित्रीबाई फुले १८३१–१८७९, डॉ. आनंदीबाई जोषी १८६५–८६ रमाबाई रानडे १८६१–१९४८, ताराबाई षिंदे १८५०–१९१० अषा कर्तृत्ववान स्त्रिया उदयाला आल्या.

समाजातील आणि कुटुंबातील आपल्या गौण स्थानाबद्दल आणि आपल्या गुलामगिरीबद्दल ती विचार करू लागली. तिची विचारषक्ती जागृत झाल्यामुळे आपले जीवन कसे असावे, आपला संसार कसा असावा आणि जीवनात आपण काय करावे याबद्दलही ती विचार करू लागली. ती स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी अर्थार्जन

महत्वाचे आहे म्हणून नोकरी करू लागली त्यामुळे घराबाहेर स्वत:बद्दलचे स्वतंत्र निर्णय घेऊ लागली. नोकरीच्या ठिकाणी (कार्यालयात) किंवा इतर जागी तिचे पुरूषांपी संबंध येऊ लागले. त्यामुळे स्त्रीपुरूषांमध्ये स्नेहबंधने निर्माण होऊ लागली. ''पिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि ते पिल्यानंतर माणूस गुरगूरल्यापिवाय रहणार नाही'. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उक्तीप्रमाणे 'पिक्षण' हा घटक स्त्री जागृत करण्यास कारणीभूत ठरला त्याचबरोबर त्याकाळातील काही आंतराष्ट्रीय व राष्ट्रीय राजकीय घटनांचा परिणामही स्त्रीजागृतीस कारणीभूत ठरल्याचे दिसते.

१) रपियात राज्यक्रांती झाली आणि तेथे समाजसत्तावादी सरकार स्थापन झाले. हा समाजसत्तावादी विचारांचा प्रभाव इ. स. १९२० नंतर तरूण सुपिक्षित वर्गावर पडू लागला.

२) भारतीय राजकारणात याच सुमारास म.गांधीचा प्रवेष झाला. इ.स. १९३० नंतर म. गांधीकडे स्वातंत्र्य लढ्यची सूत्रे गेली. त्यांच्या स्त्रीविषयक भूमिकेमुळे अनेक स्त्रिया राजकारणात आणि समाजकारणात उतरू लागल्या आणि त्यामुळे घराबाहेरची अनेक क्षेत्रे स्त्रियांना खुली झाली.

३) या सुमारास पहिल्या महायुद्धास प्रारंभ झाला, आणि ते इ.स. १९१९ साली संपुष्टात आले. पहिल्या महायुद्धाची झळ भारताच्या अर्थव्यवस्थेवर पोहचली. महागाई वाढली. दारिद्र्यही वाढले. त्यामुळे इ. स. १९२० नंतर कुटुंबाला आर्थिक मदत करण्यासाठी स्त्रिया नोकऱ्या करू लागल्या.

वर्णव्यवस्था व पुरूषसत्ता टिकविण्यासाठी उच्चवर्णीयांनी अनुकूल अपा धर्मग्रंथांची रचना केली. पुरूषप्रधान संस्कृती मानणारे आर्य भारतात आले. त्यांनी बालविवाह बहुपत्निकत्त्व, विधवांचा अमानुष छळ, सतीची चाल अपा अनेक भयानक व स्त्रीची विटंबना करणाऱ्या चालीरीती सुरू केल्या. हिंदू समाजातील स्त्रीचा अधिकार काढून टाकला आणि पुरूष प्रधान व स्त्री दुय्यम हे सूत्र समाजमनात पक्कं रूजवून टाकलं. तेंव्हापासून ते १९ व्या पतकात इंग्रजांचं राज्य येईपर्यंत स्त्रीची स्थिती अपी राहिली आणि नंतर इंग्रजाच्या आगमनाने पिक्षण, कर्ते समाजसुधारक त्यांनी निर्माण केलेल्या विविध संस्था तसेच पहिले महायुद्ध, रपियाची राज्यक्रांती, डॉ. बाबासाहेव आंबेडकरांचे हिंदू कोड बिल या सर्व घटनांचा परिणाम स्त्री वर्गावर झाला आणि येथूनच तिच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला,

स्त्रीने पिक्षण घेण्यास सुरवात केली आणि स्वत:चे भलेबुरे तिला कळू लागले, स्वत:वर झालेला अन्याय ती आता लेखनाच्या रूपाने मांडू लागली. तिकडे विदेपात पुरूपांच्या स्वार्थी वृत्ती वर्तणुकीविरोधी लढा 'केट मिलेटने' सुरू केला. पुरूपांची दडपपाही झुगारून त्यांच्या बरोबरीने हक्क हवेत म्हणून ह्या समर्थ संग्रामाची प्रर्वतिका केट मिलेट बनली, व तिच्या स्वानुभवातून स्फोटाचे स्फुंल्लींग फुलले

खरे पाहता १९७१ सालच्या ह्या प्रयत्नाला उत्तम पूर्वपिठिका होती ती १९६६ मध्ये 'बेटी फ्रायडन'ने 'राष्ट्रीय महिला संघटना' स्थापली आणि नोकरीत स्त्रीयांविरूध्द होणा—या पक्षपातासंबंधी लढा उभारला. त्यांनी जवळजवळ १२९० संस्थानांवर या कारणामुळे खटले चालवले. १९६७ ला वापिंग्टन मध्ये स्त्री हक्काचा आठ कलमी जाहिरनामा प्रसिध्द झाला. नव—याने घरकामात बरोबरीने मदत करावी, अपत्य संगोपनाची जबाबदारी एकट्या स्त्रीची नाही, आईबापाची ती समान मानली जावी अपी त्यात मागणी होती. वस्तूत: त्याआधी म्हणजे १९४९ साली ही चळवळ जोरात होती, तेव्हा मागण्या होत्या मतदानाचा अधिकार पिक्षण व्यवसायात समान वाव आणि कायद्याने स्त्रीला समान स्थान पण त्यापैकी फक्त मतदानाचा हक्क दिला गेला. कोलंबिया, मिषीगन विद्यापीठ १९६४ च्या कायद्यानूसार नोकरी देताना स्त्री—पुरूष भेद करणे बेकायदेषीर असून तो केला जात असल्याचे पासनाचे निदर्षनास त्यांनी आणताच पासनाने विद्यापीठाचे अनुदान थांबवले पुढे तिथल्या महिला वर्गाने यषस्वी महिला पंतप्रधान कपी असावी यावर विचारविनिमय सुरू केला. जर्मेनीग्रीअर — १९८४, मग दक कमेजपदलए नॉमी वुल्क — १९९३, थ्यतम ूपजी पितम इ.नी. स्त्रीवादी चळवळीची राजकीय तत्वज्ञान म्हणून मांडणी केली.

ISBN: 978-81-927095-1-2


२७ ऑगस्ट १९७० ला त्या महिलांनी देशभर संप पुकारला. समान हक्कासाठी 'विषमता निर्मूलन', 'महिला कृती समिती'ची स्थापना क्लीव्हलॅण्ड येथे झाली. जागोजागी स्त्रीयांच्या बाबतीत होणारा अन्याय व पक्षपात पोधून त्यांचा अभ्यास केला गेला. 'मार्था ग्रिफिथन' कायदेमंडळातून यासाठी जोरदार लढा दिला. 'ईक्री फिल्ड' हिने सरकारी व खासगी नोकरीच्या ठिकाणी होणा—या पक्षपाताविरूध्द मोहिम सुरू केली. योग्यता असूनही ज्यांना केवळ स्त्री म्हणून डावलले गेले होते अषा २० लाख स्त्री कामगारांना बढत्या मिळवून देण्याचे प्रयत्न सुरू केले, त्याचबरोबर विद्यापीठांमधून महिला जागृतीसाठी अभ्यासू वक्त्या सर्वदूर पाठवल्या. त्या स्त्रीयांना त्यांच्या व्यवसायातील धोके पटवून सांगत. 'महिलांसाठी मानवी हक्क' या संस्थेच्यावतीने स्त्रीयांना संषोधन षिक्षण व कायदेषीर मदत मिळू लागली. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून १९७० मध्ये कर्मचारी स्त्रीयांना लक्षावधी डॉलर्सची थकबाकी मिळाली. त्याचप्रमाणे फ्रांस, ब्रिटन,जर्मनी, इटली, स्पेन — पोर्तुगाल, जपान व इतर देषातही चळवळ होतच होती. या सर्वांचा परिणाम म्हणून युनोने १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून जाहिर केले. या सर्व गोष्टींचा परिणाम भारतात होणे अपरिहार्य होते हा प्रवाह आपल्याकडे आला आणि त्याचा परिणाम मराठी साहित्यावरही होणे सहाजिक होते त्यातूनच स्त्रीवादी साहित्य निर्माण होवू लागले. प्रथमच आपले आत्मभान जपणा—या आणि स्वत्व षोधणा—या स्त्रीमनाचा हुंकार स्त्रीवादाच्या रूपाने प्रकट झाला.

मराठीतील पहिली कविता भक्ती—मुक्तीच्या पलिकडे गेली नव्हती. उलट स्त्रीला अध्यात्मातील धोंड समजले जाई. परंतु आद्य कवयत्री महदंवा, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, वेणाबाई, सोयराबाई प्रेमाबाई बयाबाई, कान्होपात्रा, कमळाबाई, निर्मळा इत्यादी संत कवयत्रींच्या कवितेकडे वेगळ्या दृष्टिने पाहिले जावू लागले. आपल्या देषात १९८० नंतर स्त्रीवादी कवयित्रींची एक पिढीच उदयास आली. या काळात जवळपास १५० ते २०० काव्यसंग्रह प्रकाषित झाले. त्यातील काही निवडक कवयित्री म्हणजे मलिका अमर षेख, रजनी परूळेकर, निरजा, अष्विनी धोंगडे, प्रभा गणोरकर, अरूणा ढेरे, आसावरी काकडे, अनुराधा पाटील, उर्मिला चाकूरकर, सुमती लांडे, वृषाली किन्हाळकर, स्वाती षिंदे—पवार, विजया संगवई, ज्योती लांजेवार, डॉ.सोमा साखरे, हिरा बनसोडे, प्रज्ञा लोखंडे, माया दामोदर, इ. कवयित्री या काळात उदयास आल्या तसेच कांदबरीच्या क्षेत्रातही थांग, मुक्काम, कारावासातून पत्रे, मध्य लटपटीत, एकेक पान गळावया, दुस्तर हा घाट, निरगाठी, काही दूरपर्यंत, तेरूआ, उत्खनन, गोफ, इत्यादी कादंब—या गौरी देषपांडे यांनी लिहिल्या तर रीटा वेलिणकर — षांता गोखले, स्थलांतर, आवर्तन, अवकाष, इत्यादी कादंब—या सानिया यांनी लिहिल्या. पूढे एका ष्वासाचं अंतर — अंबिका सरकार, रेषोट्या — प्रतिभा रानडे, मनस्विनी, झुंबर, आकाष, — आषा बगे यांच्या तर टिकली एवढं तळं — निर्मला देषपांडे, पार्टटाईम — प्रतिमा इंगोले, इत्यादी लेखिकांच्या लेखनात स्त्रीवाद हा भरभरून आल्याचे दिसून येते.

कथेच्या बाबतीत स्त्रीवादी लेखिकांची नावे घ्यावयाची झाल्यास गौरी देषपांडे, उर्मिला सिरूर, सानिया, अंबिका सरकार, सुकन्या आगाषे, आषा बगे, प्रिया तेंडुलकर, उर्मिला पवार, सुनिता आफळे, यांची नावे समोर येतात. तर नाटकाच्या बाबतीत ज्योती म्हापसेकर, रूपा कुलकर्णी, सई परांजपे, प्रषांत दळवी, विजय तेंडुलकर हे स्त्रीवादी नाटककार आहेत. आत्मकथनामध्ये आहे मनोहर तरी, नाच ग घुमा, नाथ हा माझा, मी दूर्गा खोटे, जगली अषीही आत्मचरित्रे, तसेच षांताबाई कांबळे, बेबी कांबळे, कुमुद पावडे, नजुबाई गावीत आदि दलित आत्मकथने स्त्रीयांची स्त्रीवादी म्हणवतील अषी आहेत.

पुढे मराठी साहित्यातील सर्वच लेखनप्रकारात मग ती कविता असो की कादंबरी किंवा अगदी नाटक, आत्मचरित्र, कथा, ललित लेखन या सर्वांमध्ये स्त्रीवादी सामाजिकता, जीवनचिंतन, स्त्री जाणीवांचे कंगोरे नातेसंबधातील जाणिवा, संस्कृतीचा उपहास, स्त्रीयांचे विविध प्रष्न, आत्मभान, संस्कृतीचा उपहास, एकटेपणाची जाणीव, वेदनेचे हुंकार, नवे प्रष्न, आषावाद इत्यादी पैलूंचा वेध घेण्याचे प्रमाण वाढले.

एलेन षोवॉल्टर यांनी प्रथमच मांडलेल्या स्त्रीवादी साहित्याच्या रूपरेषेमुळे १९६० पासून सुरू असलेली

स्त्रीवादी समीक्षा 'टेक्सुच्युअल पॉलिटिक्स' या एककेंद्री परिघामधुन बाहेर पडली. आजचे स्त्रीवादी साहित्य पारंपरिक मुल्यांना धक्का देताना दिसते. स्त्रीवाद हा स्त्रीने फक्त ऐकावा बोलू नये. या पारंपरिक विचारसरणीला नकार देताना दिसते. स्त्री केवळ घेणारी आहे व पुरूष देणारा आहे या विचारांनाही आता नकार मिळत आहे. तसेच केवळ 'चुल आणि मुल' या पारंपरिक विचारालाही नकार देत आहे. स्त्रीवादाने स्त्रीच्या पारंपरिक मानसिकतेत आमुलाग्र बदल घडवून आणला आहे हे नक्की.

संदर्भटीपा


१) ''प्लूटाक्रकृत केटो'' भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास, इतिहासाचार्य वि.का.राजवाडे; लोकवाङ्मय गृह.

२) सार्थ श्रीमनुस्मृति, वेदषास्त्रसंपन्न विष्णुषास्त्री बापट, रघुवंषी प्रकाषन दादर, मुंबई—२८

३) मॅन ॲण्ड वूमन, हॅवेलॉक एलीस (आधार :— भारतीय स्त्रीजीवन, गीतासाने. मौज प्रकाषन गृह .)

४) सेक्स इन रिलेषन टू सोसायटी : लेखक हॅवेलॉक ऐलीस, (आधार : भारतीय स्त्रीजीवन, गीतासाने. मौज प्रकाषन गृह.)

५) निर्णय सिंधू पृ. क्र. ६२६ आधार :''महर्षि ते गौरी'', स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल'' मंगला आठलेकर राजहंस प्रकाषन पुणे.

६) ''महर्षि ते गौरी, ''स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल'' मंगला आठलेकर राजहंस प्रकाषन पुणे,

७) ''भस्त्रा माता पितुः पुत्रो येन जातःस एंव स.'' (मुळ) महाभारत, आदिपर्व, ७४:११० आधार पृ. क्र. ९. भारतीय

स्त्रीजीवन, गीता साने, मौज प्रकाषन गृह. पहिली आवृत्ती ऑगष्ट १९८६

८) समाज स्वास्थ्य पृ. क्र. ४९, ५० सप्टेबर १९३१, ''महर्षि ते गौरी, ''स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल'' मंगला आठलेकर पृ. क्र. ९६,

९७. राजहंस प्रकाषन पुणे.

९) ''महर्षि ते गौरी, ''स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल'' मंगला आठलेकर राजहंस प्रकाषन पुणे,

१०) स्त्री षिक्षणाचा संघर्ष पृ.क्र.११,१२ प्रकाषक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थिनी मंच धुळे.

११) लैला महाजन, स्त्रीमुक्ती आंदोलन:विहंगमावलोकन, प्रकाषन अण्णा पाटील, मुंबई३

१२) डॉ. अष्विनी धोंगडे, 'स्त्रीवादी—समीक्षा स्वरूप आणि उपयोजन', प्रकाषन, दिलीपराज प्रकाषन पुणे